# महाराष्ट्र शासन

## उद्योग संचालनालय,मुंबई

## जिल्हा उद्योग केंद्र,नंदुरबार

# 100 दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम

## अंतिम मूल्यमापन कार्यपद्धती

# मा. मुख्यमंत्री महोदय यांचे निर्देशानुसार १०० दिवसांचा कार्यक्रम उद्योग विभाग – मूल्यमापनासाठी गुणवत्ता तक्ता

| अ.क्र. | निकष |
|---|---|
| 1 | संकेतस्थळ (Website) |
| 2 | सुकर जीवनमान (Ease of Living) |
| 3 | स्वच्छता (Cleanliness) |
| 4 | तक्रार निराकरण (Grievance Redressal) |
| 5 | कार्यालयीन सोयीसुविधा (Office Amenities) |
| 6 | क्षेत्रीय कार्यालयांना भेटी (Visits to Regional Field Offices) |
| 7 | ई-ऑफिस प्रणाली (E-Office System) |
| 8 | आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन (Promotion of Economic and Industrial Investment) |
| 9 | अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (Officers-Staff training,Service Related, Judicial Matters and use of Artificial Intelligence Technology) |
| 10 | नाविन्यपूर्ण उपक्रम (Innovative initiatives) |

# 1. संकेतस्थळ (Website)

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
| --- | --- | --- |
| अ | वापरण्यातील सुविधा (User Friendly) | योजना ऑनलाईन असून लाभार्थ्याला कोणत्याही क्षणी वापरण्याची सुविधा आहे. याबाबतची अधिक माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे. https://nashik.gov.in/en/district-industries-centre/ |
| आ | माहितीचे अद्ययावतीकरण (Updated Information) | मैत्री पोर्टलद्वारे अद्यावत माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. |
| इ | माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वयंप्रकटीकरण (Proactive disclosure under RTI Act) | जिल्हा पातळीवर योजना ऑनलाईन असल्याकारणाने पारदर्शकता आहे. |
| ई | सुरक्षितता (Data/Cyber Security) | जिल्हा पातळीवर योजना ऑनलाईन असल्याकारणाने त्याबाबत ID व Password बाबतीत सुरक्षितता बाळगली जाते. |
| उ | लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसूचित करून ऑनलयीन प्रसिद्ध करणे | लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसूचित करून कार्यालयाच्या दर्शनी भागात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. |

# लोकसेवा हक्क 2015 अधिनियमांतर्गत प्रदर्शित सूचना फलक



सुचना फलक

(महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ मधील तरतुदीनुसार अधिसुचित केलेल्या सेवांबाबत तपशिल

लोकसेवा हक्क कायदा
Right to Public Service Act

कार्यालयाचे नाव:- जिल्हा उद्योग केंद्र, २८ जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार

विभाग :- उद्योग विभाग

| अ. क्र. | अधिसुचित लोकसेवेचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली कालमर्यादा | लोकसेवा पुरविण्यासाठी निर्धारित शुल्क | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३/२०१९ अंतर्गत मुद्रांक शुल्क सवलत | ७ दिवस | नि:शुल्क | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, २८ जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार (४२५४१२) | उद्योग सह संचालक नाशिक विभाग, आय.टी.आय. जवळ,सातपुर नाशिक (४२२००७) | अतिरिक्त उद्योग संचालक,उद्योग संचालनालय, २ रा मजला,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई (४०००३२) |
| २ | सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३/२०१९ अंतर्गत पात्रता प्रमाणपत्र देणे | ३० दिवस | नि:शुल्क | | | |
| ३ | सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३/२०१९ अंतर्गत औद्योगिक प्रोत्साहन अनुदान | १५ दिवस | नि:शुल्क | | | |
| ४ | अनुदान वाटपाची पध्दत | उद्योग संचालनालयाकडे निधी प्राप्त झाल्यानंतर ३० दिवस | नि:शुल्क | | | |

तृतीय व अंतिम अपिल राज्य सेवा हक्क आयुक्त,नाशिक,सिंहगड,गर्व्हमेंट रेस्ट हाऊस,चांडक सर्कल नाशिक - ४२२००२ यांच्याकडे करता येईल

ई-मेल : rtsc.nashik@gmail.com

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,नंदुरबार

# माहिती अधिकार अधिनिय 2005 अंतर्गत प्रदर्शित फलक

## जिल्हा उदयोग केंद्र,नंदुरबार


### माहिती अधिकार अधिनियम -2005

| अक्र | माहिती अधिका-याचे पद | नाव | पदनाम | संपर्क क्र क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | सहा.जनमाहिती अधिकारी | श्री.र.मु.ताडगे | लिपीक | 02564-210048 |
| 2 | जनमाहिती अधिकारी | श्री.नि.पी.पाटील | व्यवस्थापक | 02564-210048 |
| 2 | अपिलीय अधिकारी | श्री.दि.कि.शिवदास | महाव्यवस्थापक | 02564-210048 |

# 2. सुकर जीवनमान (Ease of Living)

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | नागरी सेवांचे सुलभीकरण<br>(पूर्वीची स्थिती व सुलभीकरणानंतर झालेले बदल यांची तुलना आवश्यक) | |
| १ | विभागाच्या सर्व योजनाची माहिती, सेवा शुल्क,शासन निर्णय, नागरिकांची सनद, लोकसेवा हक्क अधिनियम,प.वै.द. मधील अ,ब,क,ड तक्ते दर्शनी भागात लावणे व अद्ययावत करणे. | विभागाच्या सर्व योजनाची माहिती, सेवाशुल्क, शासन निर्णय, नागरिकांची सनद, लोकसेवा हक्क अधिनियम दर्शनी भागत लावण्यात आलेले आहे. |
| २ | कार्यक्षेत्रातील सर्व उद्योगांची नोंदणी करणे | उद्यम नोंदणी –MSME च्या संकेतस्थळावर निशुल्क सेवा उपलब्ध आहे. |

# CMEGP माहिती फलक व उ दि ष्ट पुर्ती आढावा बैठक



## जिल्हा उद्योग केंद्र, नंदुरबार

### मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP)

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना राज्य सरकारची नवीन उद्योग उभारणीसाठी व मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीची योजना आहे. शासनामार्फत मिळणारे अनुदान उद्योग संचालनालय मार्फत त्यांनी निर्धारीत केलेल्या बँकामार्फत लाभार्थींच्या बँक खात्यात योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार जमा होईल. ही योजना नवीन उपक्रम सुरु करणेसाठी बँका मार्फत दिल्या जाणाऱ्या कर्जास संलग्न अनुदान योजना आहे.

**बँक कर्ज / आर्थिक सहाय्य**

| प्रवर्ग | घटकाची स्वगुंतवणुक | देय अनुदान (मार्जिन मनी) | | बँक कर्ज | |
|---|---|---|---|---|---|
| | | शहरी | ग्रामीण | शहरी | ग्रामीण |
| अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती / महिला / अपंग / माजी सैनिक OBC/VJNT | 5% | 25% | 35% | 70% | 60% |
| उर्वरीत प्रवर्ग | 10% | 15% | 25% | 75% | 65% |

**उत्पादन व्यवसायासाठी जास्तीत जास्तीत ५० लाख मर्यादेपर्यंत अर्ज करता येते.**

(उत्पादन प्रकारातील उपक्रमांसाठी प्रकल्प किंमती अंतर्गत इमारत खर्च 20 टक्के व खेळते भांडवल 30 टक्केच्या मर्यादेत असणे गरजेचे आहे.)

**सेवा उद्योग व्यवसायासाठी जास्तीत जास्त रु.२० लाख मर्यादे पर्यंत अर्ज करता येतो.**

**कर्ज प्रस्ताव करणेसाठी आवश्यक कागदपत्रे -**

1) फोटो 2) आधार कार्ड 3) जन्म दाखला / शाळा सोडल्याचा दाखला / डोमिसाईल सर्टी. (यापैकी एक) 4) शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र (मार्कलिस्ट) 5) हमी पत्र (खाली दिलेल्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.) 6) प्रकल्प अहवाल (वेब साईट वर तयार करता येतो) 7) जातीचे प्रमाणपत्र (SC/ST/OBC/VJNT असेल तर) 8) विशेष प्रवर्ग असेल तर प्रमाणपत्र (अपंग किंवा माजी सैनिक असेल तर) 9) REDP/EDP किंवा कौशल्य विकास प्रशिक्षण झाले असेल सर्टीफिकेट (प्रशिक्षण झाले नसेल तर प्रकरण बँकेने मंजुर केल्यानंतर प्रशिक्षण घेणे आवश्यक असेल 10) पॅन कार्ड 11) लोकसंख्येचा दाखला

**लाभार्थी पात्रता :**

कुठलेही स्थायी उत्पन्न नसलेले स्थानिक रहिवासी ज्यांचे वय 18 वर्ष पुर्ण, अधिकतम मर्यादा 45 वर्ष (अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती / महिला / अपंग / माजी सैनिक यांच्यासाठी 5 वर्ष शिथिल) पात्र राहतील.

उपरोक्त प्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट

अर्जदार व्यक्तीने PMEGP अथवा तत्सम केंद्र अथवा राज्य शासनाच्या अन्य विभागाकडील / महामंडळाकडील अनुदानावर आधारीत स्वयंरोजगार योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

**शैक्षणिक पात्रता :** 1) रु. 10 लाखावरील प्रकल्पासाठी 7 वी उत्तीर्ण 2) रु. 25 लाखावरील प्रकल्पासाठी 10 वी उत्तीर्ण

**अर्ज करण्याची पध्दत -** ऑनलाईन अर्ज करण्यासाठी https://maha-cmegp.gov.in या संकेत स्थळावर संपर्क करावा.

महाव्यवस्थापक
**जिल्हा उद्योग केंद्र, नंदुरबार**
फोन नं. 02564-210055
E-mail : didic.nandurbar@maharashtra.gov.in

**जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी**
**खादी ग्रामोद्योग मंडळ, नंदुरबार**
फोन नं. 02564-210056
E-mail : dvlonandur@rediffmail.com

संपर्क : 9855918094 / 7588077307







# 3. स्वच्छता

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | अभिलेखे निंदणीकरण व वर्गीकरण. | अभिलेखे निंदणीकरण, वर्गीकरण काम प्रगतीपथावर |
| ब | मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करणे | प्रगतीपथावर आहे. |
| इ | जड वस्तू संग्रह नोंवाही अद्ययावतीकरण | अदयावत आहे. |
| ई | जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट | पुर्ण झालेली आहे. |
| उ | जुन्या वाहनांचे निर्लेखन | लागू नाही. |

# 4. तक्रार निवारण

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | आपले सरकार पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण (दि.१ जानेवारी, २०२५ पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे) | १ जानेवारी २०२५ पूर्वीचे तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे. तक्रार प्रलंबीत नाही. |
| आ | पी.जी. पोर्टल वरील तक्रारींचे निराकरण (दि.१ जानेवारी, २०२५ पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे) | १ जानेवारी २०२५ पूर्वीचे तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे. तक्रार प्रलंबीत नाही. |
| इ | अभ्यागत भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळांबाबत प्रसिद्धी | प्रदर्शित केला आहे. |
| ई | लोकशाही दिनाचे आयोजन व त्यामधील तक्रारींचे निराकरण | लोकशाही दिनामध्ये प्राप्त तक्रारींचे नियमित निराकरण करण्यात येते. तक्रार प्रलंबीत नाही. |

# अभ्यागतांना भेटण्याची वेळेचा सुचना फलक



# 5. कार्यालयीन सोई सुविधा

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | कायमस्वरूपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था | कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेली आहे. |
| आ | कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची व्यवस्था | कार्यालयाची इमारत प्रशासकीय इमारतीत असुन स्वच्छ प्रसाधनगृहाची व्यवस्था उपलब्ध करण्यात आलेली आहे. |
| इ | अभ्यागतासाठी सुसज्ज प्रतीक्षालय व्यवस्था | उपलब्ध करण्यात आलेली आहे. |
| ई | कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावणे | नामफलक लावण्यात आलेली आहेत. |
| उ | कार्यालयाचे सौंदर्यीकरण | कार्यालयाचे सौंदर्यीकरण वेळोवेळी करण्यात येते. |

# अभ्यागत व कर्मचारी यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था



# कार्यालयीन नाम फलक



# 6. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
| --- | --- | --- |
| अ | आठवड्यातून किमान २ दिवस क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देऊन पाहणी करणे | आठवड्यातून किमान २ दिवस क्षेत्रीय औदयोगीक घटकांना भेटी देण्यात येतात. |
| आ | केंद्र आणि राज्य शासनाच्या महात्तवाच्या कार्यक्रम/ प्रकल्पांना भेटी देऊन अंमलबजावणी व पर्यवेक्षण करणे. | क्लसटर व इतर प्रकल्पांना वेळोवेळी भेट देऊन मार्गदर्शन करण्यात येते. |
| इ | क्षेत्रीय भेटी दरम्यान ग्राम पंचायत, शाळा, अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्र यांना भेटी देऊन कामकाजावर देखरेख ठेवणे. | लागू नाही. |
| ई | ग्राम स्तरावरील कर्मचाऱ्यांचे अनुभव, अडचणी व सूचना यावर त्वरित कार्यवाही करणे. | लागू नाही. |





# 7. ई- ऑफिस प्रणाली

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | प्रशासकीय कामकाजात १ जानेवारी २०२५ पासून ई- ऑफिस प्रणालीचा वापर करणे. | याबाबत कार्यवाही सुरु आहे. |
| आ | ई- ऑफिस प्रणालीत ४ किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणांचा निपटारा करणे. | याबाबत कार्यवाही सुरु आहे. |

# 8. आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन

| अ. क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे | दि. 09 एप्रिल 2025 रोजी गुंतवणूक परिषदेचे आयोजन करून 87 उद्योग घटकांचे रु. 2521.92 कोटी गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले असून त्यातून 3240 रोजगारनिर्मिती होणार आहे. |
| आ | व्यापारी/ कामगार वर्गाच्या संघटनांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी सोडविणे | दि. 30 .12.2024 मा.जिल्हाधिकारी ,नंदुरबार यांच्या अध्यक्षतेखाली रोजी जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा घेऊन उद्योजकांच्या अडचणींचा निराकरण करण्याचे प्रयत्न करण्यात आले. |
| इ | गुंतवणूकदार उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण करणे | गुंतवणूक परिषदेमध्ये सामंजस्य करार केलेल्या उद्योजकांना वेळोवेळी संपर्क साधून त्यांच्या अडचणींचे निराकरण केले जाते. |
| ई | गुंतवणूकदार उद्योजकांसाठी कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे हाताळणे | दि. 30.12.2024 रोजी जिल्हा उद्योग मित्र समितीच्या सभेत ठरल्यानुसार मा.जिल्हाधिकारी ,नंदुरबार अध्यक्षतेखाली उद्योगांच्या विषयांबाबत औदयोगीक क्षेत्रात उदयोग घटकांना पोलीस सुरक्षा संबंधित सुचना देण्यात आल्या करण्यात आलेली आहे. |

# गुंतवणूक परिषद दिनांक.09 एप्रिल 2025



# गुंतवणूक परिषद दिनांक.09 एप्रिल 2025






# जिल्हा उद्योग मित्र समिती बैठक,गुंतवणूकदार उद्योजकांच्या अडचणी सोडविण्याकरिता दि.30.12.2024 रोजी आयोजित







## 9. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (Officers-Staff training,Service Related, Judicial Matters and use of Artificial Intelligence Technology)

| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षित करणे | दि.14 एप्रिल 2025 ते 24 एप्रिल 2025 या कालावधीत कुंडल ता.पलूस येथे पायाभूत प्रशिक्षण सुरु आहे. |
| आ | पदोन्नत्या व कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण करणे | कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण वेळोवेळी करण्यात येते. |
| इ | कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान वापरण्यासाठी अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे | - |
| ई | कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर(AI) सुरु करणे. | - |

कार्यालयीन कर्मचारी यांचे दि.14 एप्रिल 2025 ते 24 एप्रिल 2025 या कालावधीत कुंडल ता.पलूस येथील पायाभूत प्रशिक्षण





| अ.क्र. | तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|
| अ | कार्यालयात किमान २ नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे. | १. अदयौगीक समुह विकास योजनेत नवीन समुह KGV Lab Grown D aimond Cluster ला शासना कडुन मान्यता प्राप्त करुन घेतली.<br><br>२. मेळावे आयोजित करून योजनां बद्दलची माहिती देण्यात आली. |

# 1.मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP)

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत सन-2024-25 आर्थिक वर्षासाठी जिल्हयास 448 लाभार्थ्यांचे कर्ज मंजुरीचे उदिष्ट प्राप्त झालेले होते. दि.31.03.2025 पर्यत ची स्थिती खालील प्रमाणे.

| अक्र | यंत्रणा | उदिष्ट संख्या | साध्य संख्या | अनुदान रक्कम/MM Amt रु लाखात | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा उदयोग केंद्र | 269 | 319 | 528.56 | 118 |
| 2 | खादी ग्रामोदयोग महामंडळ | 179 | 43 | 72.73 | 24 |
| एकुण | | 448 | 362 | 601.29 | 80.80 |

उद्दीष्ट पूर्ततेच्या दृष्टीने कर्जप्रकरणे विविध बँक शाखांना शिफारशीचे प्रमाण वाढविण्याच्या उद्देशाने जिल्हयातील आसेटी ,उमेद,माविम,तांत्रिक शैक्षणिक संस्था, आयटीआय, एनजीओ, महिला बचत गट यांच्या माध्यमातुन जिल्हाभर मेळावे आयोजित करण्यात येवुन कर्ज प्रकरणे बँकांना शिफारशीचे प्रमाण उर्वरीत उद्दीष्टाच्या तीन पटीने कर्जप्रकरणे शिफारस करण्यात आलेले होते

.



# २८ कोटींच्या कर्ज मंजूरीतून ३६२ लाभार्थी उभारणार स्वतःचे उद्योग

## जिल्हा निर्मितीनंतर प्रथमच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातंर्गत १०० टक्के उद्दिष्ट पूर्तता; किमान अडीच हजार बेरोजगारांना मिळणार रोजगार

**नंदुरबार :** जिल्हा निर्मितीपासुन पहिल्यांदा जिल्हा उद्योग केंद्रामार्फत वित्तीय संस्था, बँकाच्या सहकार्याने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकुण ३६२ लाभार्थ्यांचे सुमारे २८ कोटी रुपयांची कर्ज प्रकरणे मंजुर करण्यात आली. ज्यात निर्मिती उद्योग घटक ८१ तसेच सेवा उद्योग घटक २८१ इतके असून कर्ज मंजुर झालेल्या लाभार्थ्यांना शासनामार्फत अनुदान, मार्जिनमनी रक्कम, अनुदान, मार्जिनमनी रक्कम १५ ते ३५ टक्क्यांप्रमाणे मिळणार आहे. सदर योजनेच्या माध्यमाने बेरोजगारी कमी होऊन स्थलांतराचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.यातून किमान २००० ते २५०० युवक युवतींना रोजगार निर्मिती झाल्याची माहिती जिल्हा नियोजन भवन कार्यालयात पार पडलेल्या गुंतवणूक परिषदेप्रसंगी देण्यात आली.

अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन भवन कार्यालयात पार पडलेल्या गुंतवणूक परिषदेप्रसंगी उद्योग विभागाचे वृषाली सोने, उद्योग सहसंचालक, नाशिक, दिलीप पाटील व्यवस्थापक, विभागीय कार्यालय, नाशिक तसेच मैत्री, मुंबई कक्षाचे किशोर चव्हाण उपस्थित होते. जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविलेल्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत सन-२०२४-२५ या आर्थिक वर्षात जिल्हाधिकरी डॉ.मित्ताली सेठी यांच्या प्रयत्नाने जिल्हयाचे १०० टक्के कर्ज मंजुरीचे उद्दिष्ट पुर्ततेसाठी ज्यांनी परिश्रम घेतले, अशा अधिकारी कर्मचाऱ्यांचे वृषाली सोने, उद्योग सहसंचालक, नाशिक विभाग यांनी जिल्हाधिकरी डॉ.मित्ताली सेठी, सचिन गांगुर्डे, अग्रणी बँक व्यवस्थापक, एसबीआय नंदुरबार तसेच जिल्हा उद्योग केंद्राचे

सर्व सहकारी यांचे आभार मानले.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम उद्दिष्ट पूर्ततेसाठी दीपेंद्रसिंह कुशवाह विकास आयुक्त उद्योग मुंबई यांनी वर्षाच्या सुरुवातीपासुन योजनेचे उद्दिष्ट पुर्तीसाठी वेळोवेळी विभागीय आयुक्त, (महसुल) जिल्हाधिकरी, तसेच बँकांचे विभागीय अधिकारी यांच्या आढावा बैठका तसेच ऑनलाईन बैठकांच्या माध्यमाने समन्वय साधुन कर्ज मंजुरीसाठी मार्गदर्शन केले. तसेच विभागीय स्तरावर वृषाली सोने, उद्योग सहसंचालक, नाशिक यांनी वेळोवेळी बँकाचे झोनल ऑफिसर यांच्या आढावा बैठका, जिल्हास्तरावर जिल्हा बँक समन्वयक, शाखा व्यवस्थापक यांच्या बैठका तसेच ऑनलाईनव्दारे बैठका आयोजित करुन उदिष्ठ पुर्ततेसाठी प्रयत्न केले. तसेच सचिन गांगुर्डे,



### १००० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट

चालु आर्थिक वर्षात १००० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट जिल्हयास प्राप्त झाले आहे. त्यासाठी सुशिक्षित बेरोजगार युवक, युवतीनी योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन दिपक शिवदास, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी केले आहे.

सहकार्याने जिल्हा स्तरावरील बँकेचे शाखाधिकारी यांच्याशी समन्वय साधुन गाव पापळी तालुका स्तरावर कॅम्पचे आयोजन करुन जास्तीत जास्त

शिवदास, महाव्यवस्थापक व त्याचे सहकारी एन.पी.पटील व्यवस्थापक, दिपक सुर्यवंशी, गिरीष चौधरी, उद्योग निरिक्षक, शेख नासीर यांनी परीश्रम

# मुख्यमंत्री रोजगार सृजन कार्यक्रम के तहत शत-प्रतिशत लक्ष्य हासिल

नंदुरबार (जाविद शेख )

आज दिनांक ०१.०४.२०२५ को जिला नियोजन भवन कार्यालय में मुख्यमंत्री रोजगार सृजन कार्यक्रम उद्देश्य प्राप्ति कार्यक्रम का आयोजन जिला



कलेक्टर डॉ मित्तली सेठी की अध्यक्षता में किया गया। इस अवसर पर उद्योग विभाग की संयुक्त निदेशक वृषाली सोन, नासिक के उद्योग विभाग के संयुक्त निदेशक दिलीप पाटिल, नासिक के विभागीय कार्यालय के प्रबंधक दिलीप पाटिल और मैत्री मुंबई सेल के किशोर चव्हाण विशेष रूप से उपस्थित थे। वित्तीय वर्ष २०२४-२५ के लिए जिला उद्योग केंद्र, नंदुरबार के माध्यम से कार्यान्वित मुख्यमंत्री रोजगार सृजन कार्यक्रम के अंतर्गत, मा. नाशिक उद्योग विभाग की संयुक्त निदेशक वृषाली सोन ने जिलाधीश डॉ. मित्तली सेठी के प्रयासों से जिले के १०० प्रतिशत ऋण स्वीकृति के लक्ष्य को प्राप्त करने के लिए कड़ी मेहनत करने वाले अधिकारियों और कर्मचारियों को धन्यवाद दिया। जिला कलेक्टर डॉ. मित्तली सेठी, एसबीआई नंदुरबार के अग्रणी बैंक प्रबंधक सचिन गंगुर्डे, साथ ही जिला उद्योग केंद्र के महाप्रबंधक दीपक शिवदास और उनके सभी सहयोगियों को पुष्पगुच्छ भेंट कर विशेष धन्यवाद दिया गया। नंदुरबार जिले के निर्माण के बाद पहली बार वित्तीय संस्थाओं/बैंकों के सहयोग से जिला उद्योग केंद्र के माध्यम से वित्तीय वर्ष २०२४-२५ में कुल ३६२ लाभार्थी ऋण मामले स्वीकृत किए गए। जिसमें विनिर्माण उद्योग घटक ८१ तथा सेवा उद्योग घटक २८१ हैं। जिन लाभार्थियों को ऋण हेतु स्वीकृति दी गई है, उन्हें सरकार के माध्यम से १५ से ३५ प्रतिशत तक की सब्सिडी/मार्जिन मनी राशि मिलेगी। इस योजना से बेरोजगारी कम होगी और पलायन की दर में कमी आएगी। इस योजना के माध्यम से कम से कम २००० से २५०० युवाओं को रोजगार मिला हैं।



# 2.पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम(PMEGP)

- पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत दिनांक 31.03.2025 अखेरपर्यंतची प्रगती खालीलप्रमाणे आहे

| उदिष्ट संख्या | साध्य संख्या | अनुदान रक्कम/MM Amt रु लाखात |
|---|---|---|
| 57 | 89 | 1514.77 |

सदर योजने अंतर्गत प्राप्त उद्दीष्ट पुर्ण झालेले असून तसेच ज्यांचे अनुदान दावे योजनेच्या पोर्टलवर सादर झालेले नाही त्यांचे अनुदान दावे पोर्टलवर सादर करणेकरीता बँकेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

# 3.उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम(EDTP)

- उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत जिल्हयास

| योजनेचे नाव | लक्षांक | | साध्य | |
|---|---|---|---|---|
| | आर्थीक | भौतिक | आर्थीक | भौतिक |
| उद्योजकता विकास प्रशिक्षण योजना | 16.00 लक्ष | 533 | 15.85 लक्ष | 528 |

- खालीलप्रमाणे  प्रशिक्षण कार्यक्रम पुर्ण करण्याचे उद्दीष्ट प्राप्त सदर योजने अंतर्गत १०० दिवस कार्यक्रमाअंतर्गत एससीपी देयके कोषागार कार्यालयात सादर करून निधी वितरीत करण्यात आला आहे.

# 4.सामुहिक प्रोत्साहन योजना (PSI)

- सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत विविध प्रयोजनार्थ मुद्रांक शुल्क सवलत प्रमाणपत्र, पात्रता प्रमाणपत्र तसेच अनुदान दावे कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर त्यावर सत्वर कार्यवाही होवून परिपुर्ण प्रकरणांत विहीत कालमर्यादेत कार्यवाही पुर्ण करण्यात येत आहे.

- तसेच लोकसेवा हक्क अधिनियम अन्वये निश्चित केलेल्या कालावधीत सर्व प्रकारच्या प्रकरणे कार्यवाही करुन प्रलंबित प्रकरणांची संख्या निरंक ठेवण्यात येईल.

# 5.औद्योगिक विकास समुह योजना(Cluster)

- जिल्हयामध्ये सद्य:स्थितीत एकुण 03 औद्योगिक समुह मंजूर झालेले
- असून सदरचे औद्योगिक समुह कार्यरत झालेले आहे.
- जिल्हयामध्ये एकुण 01 औद्योगिक समुह प्रस्तावित असून त्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल व सदर चे औद्योगिक समुह पुर्णत्वास नेण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल.
- प्रस्तावित औद्योगिक समुहांपैकी

1. KGV Lab Grown Diamond Cluster या क्लस्टरला १०० दिवस कार्यक्रम कालावधीत राज्यशासनाची मंजुरी प्राप्त करून घेतली.

# टेक्सटाईल क्लस्टर,नवापुर



# शहादा तालुक्यात नवीन औदयोगीक वसाहतीसाठी मा. अति जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक –(उदयोजक,वि वि ध संघटना व शासकिय अधिकारी कर्मचारी)

पुण्य नगरी

## औद्योगिक हबमुळे निर्माण होणार रोजगाराच्या संधी

### स्थलांतर थांबण्यास होणार मदत; अपर जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शहाद्यात उद्योजक, व्यापाऱ्यांची बैठक

**शहादा :** तालुक्यात औद्योगिक प्रयोजनाची आवश्यकता आहे. एकाच ठिकाणी औद्योगिक हब निर्माण झाल्यास वीज, पाणी, मुबलक जागा, रस्ते कमी दराने उपलब्ध होऊन बाय प्रोडक्शन सुरु झाल्यास सोयीचे होणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या शंभर दिवसाचा अभियानांतर्गत अभियान राबविण्यात येत असुन व्यापारी, उद्योजक व अधिकारी यांचा समन्वय घडून येणार असल्याचे अप्पर जिल्हाधिकारी डॉ.धनंजय गोगटे यांनी सांगितले.

शहादा येथील पंचायत समितीच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात शहादा तालुक्यातील व्यापारी, उद्योजक, लँड डेव्हलपर्स, जिनिंग प्रोसिसिंग कंपनी आदींच्या उपस्थितीत औद्योगिक प्रयोजनाच्या आवश्यकतेवर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शहादा उपविभागीय प्रांताधिकारी सुभाष दळवी, तहसिलदार दीपक गिरासे, शहादा महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता अनिल झटकर, उप कार्यकारी अभियंता बी.व्ही.जगताप, नंदुरबार




जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक एन.पी.पाटील, शहादा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विकास राठोड, नायब तहसिलदार शैलेंद्र गवते, पंचायत समितीचे कार्यालयीन प्रशासन अधिकारी रवींद्र कुलकर्णी उपस्थित होते. बैठकीदरम्यान, शरद पाटील यांनी सांगितले की, शहादा परिसरातील १५ ते २० किलोमीटर अंतरावर उद्योजकांनी व्यवसाय थाटला असून जमिन, पाणी, वीज पुरवठा आदी पायाभूत सविधांकरीता सुमारे ६५ टक्के करावा लागणारा खर्च सुमारे १५ टक्क्यांवर येणार आहे. या भागात पाचशे एकर जागा उपलब्ध करून औद्योगिक प्रयोजनाचे नियोजन झाल्यास स्थानिक उद्योजकांना उद्योगाची चांगली संधी उपलब्ध होणार आहे. शहादा व्यापारी असोसिएशन अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल यांनी सांगितले की, सहकारमहर्षी स्व.पी.के अण्णा पाटील यांनी मोहिदा भागात महाराष्ट्र राज्य विकास महामंडळाचे औद्योगिक प्रयोजन असे फलक लावले होते. परंतु पुढे प्रश्न निर्माण झाला.येथे पाणी, जागा, लेबर, वीज उपलब्ध आहेत. एकाच ठिकाणी उद्योग व प्रोसिसिंग करणारे नसल्याने मजुर स्थलांतर होत आहे. औद्योगिक हब निर्माण झाल्यास समस्या सुटणार आहेत. मंजुळा पाटील यांनी औद्योगिक प्रयोजनाची जागा उपलब्ध झाल्यास मालावर प्रोसिसिंग करणारे उद्योग सुरु झाल्यास तरुण वर्ग याकडे वळून भरभराट होणार असल्याचे सांगितले.

अप्पर जिल्हाधिकारी डॉ.धनंजय गोगटे यांनी सांगितले की, आ.राजेश पाडवी यांनी मतदारसंघात औद्योगिक प्रयोजनाकरीता जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पाठपुरावा सुरु केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून शंभर दिवस इज ऑफ लिव्हींग अभियान सुरु असुन व्यापारी उद्योजक व अधिकारी यातंर्गत औद्योगिक प्रयोजनाबाबत समन्वय साधण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शहरातील व्यापारी, उद्योजक उपस्थित होते. शहादा उपविभागीय प्रांताधिकारी सुभाष दळवी यांनी शहादा परिसरात औद्योगिक प्रयोजनासाठी बागायत जमीन सोडून इतर जमीन कुठे उपलब्ध होणार याची माहिती मंडळ अधिकारी व तलाठी यांच्याकडुन तत्काळ मागवून तसा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना देणार असल्याचे सांगितले. यावेळी शरद पाटील, पारस जैन, यूनूस बागवान, पिनाकिन पटेल, किशोर पाटील, दिनेश गोयल, अल्ताफ मेमन, मंजुळा पाटील, अजय बाफना, शैलेंद्र पाटील, हंसराज गेलडा, मुकेश तेवर, राजेंद्र अग्रवाल आदी उपस्थित होते.

# ODOP Highlights



# !!धन्यवाद!!